श्री वसंतराव बंडूजी पाटील ट्रस्ट संचलित,
वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज ॲण्ड इन्स्टिटयूट ऑफ योग, सांगली.
दक्षिण शिवाजीनगर, सांगली मिरज रोड, सांगली ४१६ ४१६ फोन नं. (०२३३/२३२३७४६) vdpacollege@gmail.com

जा. क्र. VPAMC/ 37A-05 /2022-23 दिनांक: 19 APR 2023

# सेवांकुर भारत ओळख, अनुभव कथन व CPR SESSION अहवाल

महाविद्यालय संलग्नित कायाचिकित्सा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना एकक व स्वस्थवृत्त एवं योग विभाग अंतर्गत शुक्रवार दिनांक १८/०४/२०२३ रोजी दुपारी ०२:०० ते ०५:३० या वेळेत महाविद्यालयामध्ये सेवांकुर भारत द्वारा आयोजीत सेवांकुर भारत ओळख, अनुभव कथन व CPR म्हणजेच Cardio Pulmonary Resuscitation सेमिनार आयोजीत करण्यात आला.

सेवा आंतरराष्ट्रीय यूएसए द्वारा समर्पित सेवांकुर भारत परस्परपरिचय तसेच वन वीक फॉर नेशन म्हणजेच एक सप्ताह राष्ट्रासाठी याचे अनुभव कथन व मुलभूत जीवन समर्थन म्हणजेच बेसिक लाईफ सपोर्टचे सेमिनार सेवांकुर भारत तर्फे वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल कॉलेजमध्ये आयोजीत केले गेले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलाने व धन्वंतरी पूजनाने झाल्यामुळे परिसर तेजोमय झाला. विद्यार्थीनींनी धन्वंतरी स्तवन सादर करुन कार्यक्रमाला ऊर्जात्मक व आध्यात्मिक केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ.मनोज कुमार पाटील सर व प्रमुख वक्ते डॉ.राजेश पवार सर यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ.विश्वजीत गो.मेहेत्रे सर यांनी केले. प्रस्तावनेनंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डी.एच.आर. इचलकरंजीचे सी.ई.ओ.डॉ.राजेश पवार सरांनी सेवांकुर भारत बददल इत्यंभूत माहिती अतिशय नेत्र दीपक रित्या दिली.

जी.एम.सी मिरज ची सेवांकुर टीम देखील या कार्यक्रमास उपस्थित होती. जी.एम.सी. मिरज चे विद्यार्थी कु.उदय चक्रे, कु.शिवराज तौरे, कु.गगन अढवाल यांनी वन विक फॉर नेशन बददल त्यांचा स्वत:चा अनुभव सर्वांसमोर मांडला. सध्य स्थितीतील डॉक्टरांमधील सेवाभावना, समाजकार्य करण्याची गरज, सेवांकुर भारतने याबददल बजावलेली भूमिका व त्या एका आठवडयात देश सेवा केल्यामुळे त्यांच्यामध्ये सर्वांगीक झालेला बदल अभिव्यक्त केला. सेवांकुर भारत मध्ये महाविद्यालयाचे नेतृत्व करणारे प्रताप पवार यांनी आपल्या अनुभव कथनातून सेवांकुर भारत चा भाग होण्याची व वन वीक फॉर नेशन सारख्या समाजकार्यामध्ये सहभागी होण्याची भावना सर्व विद्यार्थ्यांमध्ये जागृत केली.

अल्पोपहार नंतर कार्यक्रमाचा दुसरा टप्पा म्हणजेच BLS सेमिनार सुरु झाला. डॉ.अमृता दाते मॅडम यांनी अतिशय सोप्या पध्दतीने BLS चे महत्व सांगितले. ते कधी करावे, कधी करु नये, कसे करावे, किती वेळ करावे अशा सर्व समस्यांवर योग्य मार्गदर्शन केले. डेमोच्या सहाय्याने CPR म्हणजेच Cardio Pulmonary Resuscitation चे व्यवहारी पध्दती अतिशय उत्तमरीत्या समजावून सांगीतली व प्रत्यक्ष करवुन घेतली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वजीत गो.मेहेत्रे सर यांनी मान्यवरांचे तसेच उपस्थित प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी व कार्यक्रमाचे आयोजक सर्वांचे आभार प्रकट केले. महाविद्यालयातील सेवांकुर कमिटीतील व रासेयो एककातील विद्यार्थ्यांनी संपुर्ण कार्यक्रम सुयोग्य पध्दतीने व उत्साहपुर्वक पार पाडला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. विश्वजीत गो.मेहेत्रे तसेच रायसो प्रकल्पधिकारी डॉ.अजित बी.पाटील, महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग, सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

AbPatil

राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख,
वसंतदादा पाटील आयुर्वेदिक मेडिकल
कॉलेज ॲण्ड इन्स्टिट्यूट ऑफ योग, सांगली.

Vasantdada Patil Ayurvedic Medical College And Inst. of Yoga
Reg.No. G.K.No.3581 5020 UNIV. SANGLI

प्र-प्राचार्य,
वसंतदादा पाटील आयुर्वेदिक
मेडिकल कॉलेज,सांगली.

**18th April 2023, Introduction of Sevankur Bharat, Experience Sharing & CPR (Cardio Pulmonary Resuscitation) Seminar Organised by Kayachikitsa Dept., N.S.S.Unit & Swasthavritta & Yog Department (Dr.Ajit B.Patil, H.O.D. & N.S.S. Programme Officer) V.P.A.M.C. Sangli.**















Vasantdada Patil Ayurvedic Medical College And Inst. of Yoga
Reg.No.
G.K.No.3581
5020 UNIV.
SANGLI
3212















Vasantdada Patil Ayurvedic Medical College And Institute of Yoga
Reg.No.
G.K.No.3581
5020 UNIV.
SANGLI
3212















Vasantdada Patil Ayurvedic Medical College And Institute of Yoga
Reg.No.
G.K.No.3581
5020 UNIV.
SANGLI
3212